सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई

द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलूंड, नवीन इमारत, ४ था मजला,
बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलूंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१

दूरध्वनी क्रमांक : २६४७०२१६/२६४७१३५४/२२६४७३०५५; संकेतस्थळ : https://mumbai.dvet.gov.in; ई-मेल : est.romumbai@dvet.gov.in

क्रमांक: प्राकामुं/आस्था/का-१(ब)/ता.से.जे./२०२३/ २८५५ दिनांक : 30/5/2023

**परिपत्रक -**

या कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्था/कार्यालयातील खालील विवरणपत्र-अ मध्ये दर्शविलेल्या गट-क संवर्गातील पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०२३ रोजीची तात्पुरती सेवा जेष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येत आहे.

**विवरणपत्र-अ**

| अ.क्र. | पदाचेनांव | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १ | पूर्णवेळ शिक्षक | एस-१६ : ४४९००-१४२४०० |
| २ | कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार-नि-कनिष्ठ सर्वेक्षक (तांत्रिक) | एस-१५ : ४१८००-१३२३०० |
| ३ | गटनिदेशक | एस-१५ : ४१८००-१३२३०० |

मुंबई विभागातील सर्व संस्था/कार्यालय प्रमुखांनी सदरची तात्पुरती ज्येष्ठता सूची त्यांचे आस्थापनेवरिल संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून द्यावी व त्याबाबत त्यांची पोहोच पावती घ्यावी. तसेच ज्या कर्मचाऱ्यांचे आक्षेप असल्यास सोबत जोडलेल्या विहीत विवरणपत्र-ब व विवरणपत्र-क मध्ये त्याबाबतची माहिती या कार्यालयास सादर करावी. काही कर्मचारी गैरहजर / रजेवर आहे त्यांचेदेखिल सदर जेष्ठतासूची निदर्शनास आणून द्यावी. कर्मचारी गैरहजर/रजेवर आहे ही सबब विचारात घेतली जाणार नाही.

सदर जेष्ठता सूचीबाबत सर्व संस्था/कार्यालय प्रमुखांनी खालील प्रमाणपत्र परिपत्रकाच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करावे.

*"प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त विवरणपत्र-अ मध्ये नमुद संवर्गातील दिनांक ०१/०१/२०२३ रोजीची तात्पुरती जेष्ठतासूचीमध्ये या संस्था/कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांचा समावेश झालेला असल्याची खात्री केली आहे व कोणताही कर्मचारी समाविष्ट होण्याचे बाकी नाही तसेच उपरोक्त विवरणपत्र-अ मध्ये नमुद संवर्गातील सर्व संबंधित कर्मचाऱ्यांच्या सदर जेष्ठता सूची निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे."*

ज्या कर्मचा-यांनी ज्येष्ठता सूचीचे अवलोकन करून विहीत नमुन्यावर आक्षेप असल्याचे नोंद केली आहे त्यांचे कडुन त्यांचे आक्षेप व त्यासंदर्भातील पुरावे दर्शक सर्व कागदपत्रे २ प्रतींमध्ये घेऊन कर्मचारीनिहाय ज्येष्ठतासूचीच्या आक्षेपांचा तपशिल सोबत जोडलेल्या विवरणपत्र-क मध्ये कार्यालयप्रमुखांनी तयार करुन आक्षेप अर्ज, त्याबाबत अभिप्राय

व कागदपत्रांसह सदर तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करण्यांत यावे. या कार्यालयास यापूर्वी कळविलेल्या कोणत्याही आक्षेप पत्रांचा विचार न करता सदर तात्पुरत्या ज्येष्ठता सूचीप्रमाणे नव्याने आक्षेप कळविणे बंधनकारक राहील. कार्यालयप्रमुखांनी विवरणपत्र-क तयार करताना ज्येष्ठतासूचीमध्ये जर एखाद्या कर्मचा-याचे नांव समाविष्ट झालेले नाही असे निदर्शनास आल्यास संस्था/कार्यालय प्रमुखांनी त्या कर्मचाऱ्याची माहिती ०७ दिवसांच्या आत या कार्यालयास कळविण्यात यावेत. विवरणपत्र-ब मध्ये ज्या कर्मचा-यांनी आक्षेप असल्याचे नमूद केले नसेल अथवा काहीही नमूद केले नसेल त्यांचे सदर तात्पुरत्या सेवाज्येष्ठतेसंदर्भात कोणतेही आक्षेप नाहीत असे समजून विहीत कालमर्यादेनंतर सेवाज्येष्ठतासूची अंतिम करण्यांत येईल, याची नोंद घ्यावी.

(कि.वा.खटावकर)
सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय,मुंबई-८१

प्रत:-

१) या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्था/कार्यालय प्रमुख
त्यांना कळविण्यात येते की, या परिपत्रकासोबत जोडलेल्या तात्पुरत्या सेवाजेष्ठता सूची त्यांच्या नियंत्रणाखालील संस्था/कार्यालयातील कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रादेशिक कार्यालयास सादर करावा.

२) संबधित कर्मचारी (संस्थाप्रमुखांमार्फत).